## निशाणी क्र. ५८ वर आदेश

प्रतिवादी क्र.७ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफीयतचा आदेश रद्द होऊन त्यांना लेखी कैफीयत दाखल करण्याची परवानगी देण्याची विनंती केली. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र.७ हे संगमेश्वर जि.रत्नागिरी येथे असल्यामुळे त्यांना दाव्याच्या अनुषंगाने काही महत्वाची कागदपत्रे व आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली नव्हती त्यामुळे ते मुदतीत लेखी कैफीयत दाखल करु शकले नाहीत. प्रतिवादीची कैफीयत अभिलेखावर न घेतल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे म्हणुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. वादीने सदरचा अर्ज संयुक्तीक नाही, खरा नाही असे म्हणणे मांडले. तसेच अर्जास पुरेसे कारण नाही. सदरचा अर्ज हा मोघम असुन जाणिवपुर्वक प्रकरण लांबवण्यासाठी विलंबाने अर्ज केला आहे म्हणुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०२] दोन्ही पक्षांना ऐकले. प्रतिवादी क्र.७ यांना वाद समन्स दिनांक ११/०१/२०१७ रोजी प्राप्त झाले. त्यानंतर प्रतिवादी क्र.७ दाव्यात हजर झाले. परंतु त्यांनी मुदतीत लेखी कैफीयत दिली नाही. त्यामुळे या न्यायालयाने दिनांक १३/१२/२०१७ रोजी त्यांच्याविरुध्द विना कैफीयतचा आदेश पारीत केला. परंतु सदर दाव्याच्या कामकाजाकरीता नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.७ यांचे म्हणणे ऐकुन घेणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा दावा वादीने डिक्लेरेशन व वाटपासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.७ यांनी प्रतिवादी क्र.१, ३, ६ व ८ यांनी दाखल केलेली कैफीयत स्विकारली असुन तशी adoption पुरसीस या अर्जासोबत दाखल केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या बचावात कोणताही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादी क्र.७ यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास त्यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रतिवादीचे

म्हणणे अभिलेखावर घेतल्यास दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.७ यांची लेखी कैफीयत दाखल करुन त्यांना प्रकरण बचाव करण्याची संधी देणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.७ यांनी लेखी कैफीयत देणेसाठी ०७ वर्षांचा विलंब केला. म्हणुन सदरचा अर्ज ५००/- रुपयांच्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. प्रतिवादी क्र.७ यांनी सदरचा खर्च पुढील तारखेच्या आत वादींना दयावा. सदरचा खर्च वादींना दिल्यानंतरच प्रतिवादी क्र.७ यांची adoption pursis अभिलेखावर घेण्यात यावी.

Digitally signed by SANTOSH BHOLARAM VIJAYKAR
Date: 2025.03.03 17:37:05 +0530

बार्शी
दिनांकः ०३/०३/२०२५

**(एस.बी. विजयकर)**
**सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), बार्शी.**

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule |
| (b) | Court | : | Shri.S.B. Vijaykar,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 03/03/2025 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 03/03/2025 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 03/03/2025 |